# जालना शहर महानगरपालिका,जालना

प्रशासकीय ईमारत,गांधी चौक ते रेल्वेस्टेशन रोड,

जुना जालना,जालना ४३१२०३

**जाहीर प्रगटन / निविदा सुचना**

जा.क्र.729 दिनांक 01/07/2026

जालना शहर महानगरपालिका जालना मा.सर्वसाधारण सभा दिनांक 06/04/2026 विषय क्र. (04) अन्वये जालना शहर महानगरपालिका हद्दीतील जाहीरात फलक / होर्डिंग्ज ( Kiosk / Unipole/ विद्युत पोल वरील जाहीरात बोर्ड व खाजगी आस्थापनावरील फलक शुल्क) संबंधी माध्यमे लावण्यासाठी सर्वेक्षण करण्याकरिता अनुभवी जाहिरात एजन्सीधारकांकडून / निविदा मागविण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार सर्व इच्छुक असलेल्या अनुभवी जाहिरात एजन्सीधारकांकडून जालना शहर हद्दीतील जाहीरात फलक / होर्डिंग्ज ( Kiosk / Unipole/ विद्युत पोल वरील जाहीरात बोर्ड व खाजगी आस्थापनावरील फलक शुल्क) संबंधी माध्यमे लावण्यासाठी सर्वेक्षण करण्याकरिता व्दिलिफाफा पध्दतीने निविदा /दरपत्रके माविण्यात येत आहे. ज्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) सदर सर्वेक्षणामध्ये जालना शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात जाहिरात प्रदर्शनासाठीच्या जागा निश्चित करून जियो टॅग फोटो व स्थळदर्शक नकाशासह पुस्तिका तयार करून देणे अपेक्षित आहे.
2) सदर सर्वेक्षणाची कोरी निविदा जाहिरात प्रदर्शित झाल्याच्या दि.02/07/2026 पासुन ते दि.08/07/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात रोख रक्कम रु.5000/- चा भरणा करून मिळेल.
3) सदर भरलेल्या निविदा सादर करण्याचा अंतिम दि.08/07/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत राहील.
4) सदरील भरलेल्या निविदा मालमत्ता विभागात दुपारी 03.00 वाजेपर्यंत बंद लिफाफयात सादर करण्यात याव्यात.
5) सदर निविदा शक्यतो त्याच दिवशी अथवा मा.आयुक्त महोदय यांचे आदेशानुसार उघडण्यात येतील.
6) निविदे संदर्भातील सर्व अटी व शर्ती निविदेसोबत देण्यात आलेल्या आहेत.
7) सदरची निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण आधिकार जालना शहर मनपा ने राखून ठेवले आहेत.
   निविदेच्या कामाची अधिक माहिती तसेच अटी व शर्ती मालमत्ता विभागात उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत /-**
**( त्र्यंबक कांबळे )**
**उपायुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**

**निविदा सादर करावयाची पध्दत**
**जालना शहर मनपा हद्दीतील जाहिरातीबाबत सर्वेक्षण करणे बाबत निविदा**

निविदा संच हा दोन भागात विभागलेला आहे.

**लिफ़ाफ़ा क्र.1**
या भागात निविदेची तांत्रिक माहिती :
निविदा अटीचे पुष्टीकरणार्थ आवश्यक कागदपत्रे इत्यादीचा समावेश आहे. यामध्ये खालील नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे आनिवार्य राहील.

1. एजन्सीचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन / टॅन क्रमाक, GST प्रमाणपत्र.
2. अनामत रक्कम रू.50,000/- चा मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका जालना यांचे नांवे स्थानिक बँकेवर देय होणारा धनाकर्ष / डी.डी.स्वरूपात जमा करावा.
3. निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या एजन्सीचा इतर भागीदार / संचालक इत्यादी यांचे शपथपत्र जोडणे आवश्यक राहील.
4. जाहीरात फलक /होर्डींग्स इत्यादी क्षेत्रात काम केल्याचा अनुभव / माहिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
5. इच्छुक एजन्सीधारकास जाहीरात क्षेत्राचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहील. त्यासाठी अनुभव प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक राहील.
6. इच्छुक एजन्सीधारक यांनी GST नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.
7. मागील 3 वर्षाचे आयकर परतावा भरल्याची कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**लिफाफा क्र.2**
या लिफाफ्यात निविदा दरपत्रक असावेत. दरपत्रकात सुवाच्च अक्षराने दर भरलेले असावेत.
**अटी व शर्ती:**

1. एजन्सीधारकाने महाराष्ट्र राज्यातील किमान 2 महानगरपालिकेकडून त्यांच्या जाहीरात धोरणांची माहिती घेऊन तेथील जाहीरात धोरणांचे अटी व शर्ती महापालिकेस पुरविणे बंधनकारक राहील.
2. सदरील काम हे एक महिन्यात पर्ण करावयाचे असुन विहीत मुदतीत काम पूर्ण न केल्यास प्रती दिन रक्कम रू.200/- एवढा दंड आकारण्यात येईल.
3. निविदेतील दर्शविलेले काम 100% पूर्ण झाल्यानंतर व त्याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतरच एजन्सीस देयक अदा करण्यात येईल.
4. शासन नियमाप्रमाणे देयकातून आयकर व इतर आवश्यक कपाती करण्यांत येतील.
5. निविदा स्विकारणे,अंशतः स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता निविदा पुर्णपणे नाकारण्याचा अधिकार हा मा.आयुक्त महोदय जालना शहर महानगरपालिका जालना यांनी राखुन ठेवला आहे.
6. जाहीरात फलक / सर्वेक्षणाचे काम केल्याचा अनुभव / माहिती असल्याबाबतचे कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील.
7. इच्छक एजन्सीधारकास जाहीरात क्षेत्राचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यासाठी अनुभव प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.
8. इच्छुक एजन्सीधारक यांनी GST नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.

**टिप :- लिफाफे सादर करतांना, लिफाफा क्रमांक 1 व 2 असे स्पष्ट लिहुन, दोन्ही लिफाफे एका बंद पाकीटात सादर करण्यात यावीत.**

**स्वाक्षरीत /-**
**( त्र्यंबक कांबळे )**
**उपायुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**